# मराठीचे मारेकरी

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मुद्दे ‘*’ या चिन्हाने दर्शवले आहेत.)


- मनोगत ५
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील ‘एक विद्वान’ यांनी केलेले भाष्य ६
- ‘सूक्ष्म’ या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ९

**१. मराठीच्या मुळावर उठलेले इंग्रजाळलेल्या समाजातील विविध घटक आणि क्षेत्रे १०**

१ अ. शिक्षण १०

१ अ १. सर्वसाधारण स्थिती १०

* इंग्रजी शिक्षणाला अवास्तव महत्त्व १०
* मराठीपेक्षा इतर भाषांना मिळणारे महत्त्व ११

१ अ २. इंग्रजी माध्यम अपरिहार्य वाटणे ११

* इंग्रजी माध्यमाची मगरमिठी ११
* मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठवणे अपरिहार्य वाटणारे पालक ! १२

१ अ ३. पहिलीपासून इंग्रजी १३

* शासनाचे अत्यंत अविवेकी व आत्मघातकी धोरण ‘पहिलीपासून इंग्रजी’ ! १३
* ‘इंग्रजी (आक्रमकांची भाषा) पहिलीपासून शिकवा’, असे सांगणारा (अ)ज्ञान आयोग ! १५

१ अ ४. ज्यांना प्रमाण मराठी भाषाही परकी वाटते, अशा आदिवासी मुलांसाठीही शासनाने इंग्रजी अनिवार्य केली आहे. १५

१ अ ५. मराठीद्वेष्टे काँग्रेस शासन ! १६

१ अ ६. हास्यास्पद समित्या १७
१ अ ७. इंग्रजीवाल्यांच्या दबावाला दाद देणारे; पण मराठीवाल्यांकडे दुर्लक्ष करणारे १८
१ अ ८. निर्बंध (कायदा) उल्लंघून मराठी अभ्यासक्रम बंद करून इंग्रजीत ठेवणारे मराठीद्रोही पुणे विद्यापीठ ! १९
१ अ ९. हिंदु धर्मविरोधी प्रचार व ख्रिस्ती धर्माचा प्रसार, हे आहे कॉन्व्हेंट शाळांचे खरे स्वरूप ! १९
१ अ १०. महाराष्ट्र राज्य व इतर राज्ये २०
१ अ ११. गोव्यातील पाठ्यपुस्तकासंदर्भात दुःस्थिती २०
१ अ १२. मराठीच्या अध्यापकांनी केलेला शासनाचा निषेध हा मराठीच्या प्रेमापोटीच असणे २२
१ आ. समाज २२
१ इ. वैद्यकीय क्षेत्र २५
१ ई. प्रशासन २५
१ उ. न्यायालये २८
१ ऊ. सर्वपक्षीय राजकारणी व राज्यकर्ते ३२
१ ऊ १. सर्वपक्षीय राज्यकर्ते ३२
१ ऊ २. काँग्रेसचे राज्यकर्ते ३४
१ ऊ ३. मराठीला दुरवस्था आणणाऱ्या काँग्रेसचा भीषण भविष्यकाळ ! ३८
* काँग्रेस क्षमेलाही पात्र नाही ! ३८
१ ए. दुकानदार, नाटककार, विज्ञापन देणारे व प्रसारवाहिन्या ३९
* मराठी नाटकांनाही इंग्रजी नावे देणारे भाषाद्रोही नाटककार ४०
१ ऐ. मराठीसाठी मराठीतून घोषणा न देता, त्या हिंदीतून देणारे आंदोलनकर्ते ! ४२
१ ओ. मराठीद्वेष्टे व संकुचित वृत्तीचे संस्कृतचे अभिमानी ! ४३
१ औ. संत ४३

# मनोगत

कोणताही समाज हा राष्ट्राभिमानी होण्यासाठी तो प्रथम स्वभाषाभिमानी असावा लागतो. स्वभाषाभिमानाविषयी अवघ्या महाराष्ट्राची स्थिती काय आहे, हे सर्व जण जाणतात. बहुतांश मराठी जनांकडून दहा शब्दांच्या एका वाक्यात इंग्रजी, अरबी, फारसी आदी परकीय भाषांतील एक-दोन शब्द सहजपणे वापरले जातात. परभाषांची सरमिसळ करून मराठीत बोलणाऱ्या व तसे बोलणे ऐकणाऱ्या अशा दोन्ही मराठी भाषिक माणसांना त्याची खंतही वाटत नाही.

'राजा कालस्य कारणम्' या वचनाप्रमाणे मराठी भाषेच्या या दु:स्थितीला प्रामुख्याने गेल्या ६० वर्षांतील राज्यकर्ते दोषी आहेत. त्याचप्रमाणे राजकीय पक्ष, प्रशासन, विद्यापीठे, वर्तमानपत्रे, दूरचित्रवाहिन्या आदी समाजिक घटकांनीही मराठीची दु:स्थिती वाढवण्यास हातभारच लावला आहे. या सर्वांविषयी मराठीप्रेमींच्या डोळ्यात अंजन घालणारी माहिती या ग्रंथात दिली आहे.

मराठीच्या दु:स्थितीला गेल्या ६० वर्षांतील राज्यकर्त्यांप्रमाणे समाजही तितकाच दोषी आहे; कारण त्यानेही तसे होऊ दिले. आता प्रत्येक मराठी माणसाने मराठीच्या या दु:स्थितीला आपण किती दोषी व उत्तरदायी आहोत, याचा अभ्यास करावा आणि त्यावर योग्य ती भाषाभिमानी कृती करावी. या ग्रंथमालिकेतील अन्य भागांची विज्ञापने (जाहिराती) ग्रंथाच्या शेवटी दिली आहेत. महाराष्ट्रदिन, १ मे २००८ पासून सनातन संस्थेने भाषाशुद्धीची चळवळ सुरू केली आहे. तिच्यात व्यक्तीगत स्तरावरील प्रयत्न व जनजागृती असे दोन्ही भाग अंतर्भूत आहेत. या मालिकेतील अन्य ग्रंथ वाचून सनातनच्या 'भाषाशुद्धीच्या चळवळी'ची व्याप्ती लक्षात येईल.

मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी व तिचे चैतन्य टिकवून ठेवण्यासाठी करावयाचे हे एक युद्धच आहे. त्यामुळे हा ग्रंथ वाचून झाल्यावर 'मला यासंदर्भात काय करता येईल', याचा विचार प्रत्येकाने करावा. हा ग्रंथ वाचून जास्तीतजास्त जणांना मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी व तिचे चैतन्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यास स्फूर्ती मिळो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**